# शेतकरी संघटक

पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. २५

किंमत १ रुपया

वर्ष ९ वे | ६ मे १९९२ | अंक ३ रा


# शेतकरी संघटना

## ● घटनेचा मसुदा ●

१. **शेतकरी संघटना :** शेतकऱ्यांचा या संघटनेचे नाव 'शेतकरी संघटना' राहील.

२. **शेतकरी :** शेतीत ज्याचा/जिचा घाम गळतो आणि शेतीवर ज्याचे/जिचे पोट आहे तो/ती शेतकरी, त्याच्या/तिच्या मालकीची जमीन असो वा नसो. शेतकऱ्यांत धर्म, जाती, भाषा, पक्ष इत्यादी भेदाभेद नाहीत.

३. **अधिवेशन :**

(अ) शेतकरी संघटनेसंबंधी सर्व निर्णय घेण्याचे सर्व अधिकार संघटनेच्या अधिवेशनाकडे राहातील.

(ब) संघटनेचे अधिवेशन आवश्यकतेनुसार वेळोवेळी भरवण्यात येईल. अधिवेशन भरविण्याचा निर्णय संघटनेची कार्यकारिणी घेईल.

४. **पाईक :** संघटनेच्या कामाची शपथ घेणारा व संघटनेचा बिल्ला लावणारा प्रत्येक शेतकरी संघटनेचा पाईक समजला जाईल. संघटनेची शपथ खालीलप्रमाणे -

**शपथ :** 'मी शपथ घेतो की, शेतकऱ्यांचे लाचारीचे जिणे संपवून त्यांना देशातील इतर नागरिकांप्रमाणे सन्मानाने व सुखाने जगता यावे या करिता 'शेतीमालाला रास्त भाव' या एककलमी कार्यक्रमासाठी संघटनेचा पाईक म्हणून मी सर्व शक्तीने प्रयत्न करेन. या प्रयत्नांत पक्ष, धर्म, जात वा इतर कोणत्याही भेदाभेदांचा अडथळा येऊ देणार नाही.''

५. **उद्दिष्ट व कार्यक्रम :** संघटनेचे उद्दिष्ट वरील शपथेतच स्पष्ट आहे. या उद्दिष्टासाठी संघटना आवश्यक ते सर्व कार्यक्रम हाती घेईल. जसे-

- शेतकरी व बिगर शेतकरी समाजांचे प्रशिक्षण व जागरण,
- प्रचार व कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण,
- प्रकाशने,
- नियतकालिके,
- निधी संकलन,
- संघटना बांधणी व व्यवस्थापन,
- शासन व इतर संस्थांपुढे शेतीच्या प्रश्नांसंबंधी निवेदन मांडणे,
- शेतकऱ्यांची बाजू प्रभावीपणे मांडली जावी यासाठी सर्व कायदेशीर व जरूर पडल्यास कायदेभंगाची आंदोलने चालवणे,

इत्यादी .....

६. **अध्यक्ष :**

(अ) संघटनेचा एक अध्यक्ष असेल.

(ब) अध्यक्षाची निवड सर्वसाधारणपणे एक वर्षाच्या कालावधीसाठी असेल. अध्यक्षाच्या निवडीची पद्धती प्रत्येक वेळी कार्यकारिणी ठरवेल.

७. **कार्यकारिणी :**

(अ) संघटनेची एक कार्यकारिणी असेल.

(ब) संघटनेच्या दोन अधिवेशनांच्या मधल्या काळात संघटनेसंबंधी निर्णय घेण्याचा व त्यांची कार्यवाही करण्याचा अधिकार कार्यकारिणीचा असेल.

(क) अध्यक्ष आपल्या निवडीनंतर कार्यकारिणीची पुनर्रचना करू शकेल.

(ड) कार्यकारिणीची रचना करताना व त्यातील सदस्यांची नेमणूक करतांना

## *१५ मे रोजी शेतकरी संघटना कार्यकारिणीची बैठक*

*दि. १५ मे १९९२ रोजी नाशिकजवळ शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक होणार असून या बैठकीत सद्यःस्थितीवर सांगोपांग चर्चा होऊन सघटनेच्या पुढील कामाचा आराखडा ठरविण्यात येईल.*

*या शिवाय कायदेशीर नोंदणी (Registration) करून घेण्याच्या दृष्टीने शेतकरी संघटनेची लिखित घटना बनविण्याचे कामही या बैठकीत होणार आहे. येथे पाईकांच्या माहितीसाठी शेतकरी संघटनेच्या घटनेचा कच्चा मसुदा प्रकाशित केला आहे.*

*या बैठकीत महत्त्वाच्या विषयांवर निर्णय घ्यावयाचे असल्याने फक्त कार्यकारिणीच्या सदस्यांनाच निमंत्रणे दिली आहे. इतर कार्यकर्त्यांना बैठकीत प्रवेश मिळणार नाही. व्यवस्था व निर्णयप्रक्रियेच्या दृष्टीने आवश्यक म्हणून ही सूचना देणे भाग पडते आहे असे अध्यक्ष श्री. किशोर माथनकर कळवितात.*

संघटनेच्या चालू कार्यक्रमास मजबुती येण्यासाठी खालील तत्त्वे अध्यक्ष ठेवतील.

- जास्तीत जास्त व्यापक, परिपूर्ण व प्रभावी प्रादेशिक प्रतिनिधित्व,
- वेगवेगळ्या पिकांचे उत्पादन, व्यापार, प्रक्रिया, निर्यात यांविषयी संबंधित शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व;
- संघटनेच्या कार्यक्रमांतील वेगवेगळ्या विषयांसंबंधित कार्यकर्त्यांचे प्रतिनिधित्व. उदा. प्रकाशन, प्रशिक्षण, प्रचार, न्यायालयीन कामकाज, निधी....

(इ) कार्यकारिणीची बैठक अध्यक्ष आवश्यकतेनुसार वेळोवेळी बोलावतील.

(फ) कार्यकारिणीच्या कोणत्याही सदस्यास कार्यकारिणीची बैठक बोलाविणे आवश्यक वाटल्यास त्यासंबंधी सूचना तो सदस्य अध्यक्षांस करेल.

(ग) कार्यकारिणीच्या बैठकीचे अध्यक्षपद संघटनेच्या अध्यक्षांकडे असेल; व बैठकीच्या कामकामाजाची पद्धत अध्यक्ष व कार्यकारिणी ठरवतील.

८. **बांधणी :** संघटनेचे अध्यक्ष प्रदेश, जिल्हा, सुभा, तालुका, बाजार, गाव इत्यादी पातळ्यांवर संघटनेच्या बांधणीसंबंधी व्यवस्था करतील.

९. **समन्वय :** इतर राज्यांतील समान उद्दिष्टे व कार्यपद्धती असणाऱ्या शेतकरी संघटना व संघटनेच्या उद्दिष्टास व कार्यक्रमास पूरक असलेल्या इतर संघटना, संस्था, पक्ष इत्यादी यांच्याशी समन्वय साधण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न अध्यक्ष करतील.

# मी अर्थमंत्री असतो तर –

**श्री. शामसुंदर बसेर,** जळगांव खुर्द

**मागील अंकावरून.........**

पाणी आणि रासायनिक खते यांच्या अतिवापराने जमिनी खराब व नापीक होवू नये याकरीता प्रत्येक ग्रामपंचायतीत माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळा सुरू करण्यात येईल.

शेतीला पाण्यासाठी मोठी धरणे न बांधता लहान लहान पाटबंधारे व उपसासिंचन योजना राबविल्या जातील.

निर्यात व्यापारात मिळालेल्या जादा नफ्यातून कांही रक्कम बोनस म्हणून शेतकऱ्यांना वाटण्यात येईल.

औद्योगिक उत्पादनांची (शेतमालाचे सोडून) 'उत्पादित किंमत' खरी किती होते हे शासकीय यंत्रणेमार्फत तपासून पाहिले जाईल. त्यावर १५% नफा फक्त घेता येईल. यापेक्षा जास्त नफा घेणे मोठा गुन्हा समजण्यात येईल व कडक कारवाई केली जाईल, औद्योगिक माल व शेतमाल यांच्या किंमतीत जास्त तफावत पडू देणार नाही.

मानवी व पशुपक्ष्यांच्या औषधांवर लेव्ही लावण्यात येईल. व त्या औषधांची सरकारी दुकानातून विक्री करण्यात येईल.

देशात हल्ली जकात कराचे उत्पन्न फक्त नगरपालिकांनाच मिळते. त्यांत औद्यागिक, खनीज व शेतमाल या सर्व क्षेत्रांच्या मालाची जकात फक्त शहरांच्या विकासासाठी उपयोगी पडते. त्यामुळें फक्त शहरांचाच विकास होतो. म्हणून ही प्रथा बंद करून जकातीच्या उत्पन्नातून फक्त २५% रक्कम शहरांना मिळेल व राहिलेली ७५% रक्कम ग्रामीण विभागाला वाटून देण्यात येईल.

अश्या प्रकारे वरवर कठोर वाटणारे परन्तु देशाची हमखास भरभराट व सर्वांगीण विकास साधून मजबूत पायावर राष्ट्र उभे करण्याचे सामर्थ्य या माझ्याच धोरणात आहे. याशिवाय दुसऱ्या कोठल्याही धोरणात ही प्रामाणिक ताकद नाही. अगदी मा. शरद जोशींच्या 'राष्ट्रीय कृषी धोरणात' सुद्धा हे सामर्थ्य माझ्या मते नाही आहे. तेसुद्धा कॉंग्रेसी घाटणीचेच वाटते.

त्यात अंतर्भूत असलेला देशाचा व शेतीव्यवसायाचा विकास हा जणू पोथ्यापुराण किंवा एखाद्या कीर्तनकार बाबाचे प्रवचनातील तथाकथित मोक्ष, साक्षात्कार किंवा आत्म्याची मुक्ती, स्वर्ग (जे कोणत्याही भक्ताला कधी प्राप्त होऊ शकत नाही) तो त्या काल्पनिक गोष्टींचा उपभोग आयुष्यात घेवू न शकता फक्त गूढ आणि काल्पनिक अश्या सुखासाठी मात्र स्वतःवर स्वखुषीने सनातनी बंधने लावून घेवून संयमी बनवून घेतो. मग जरी ते प्राप्त झाले नाही (आणि होतही नाही) तरी मग दुःख न बाळगता त्या सुखाला आपण पात्र नाहीत हे स्वतःच स्वतःच्या मनाला समजावून त्या विषयीचा राग-संताप गिळून 'ठेवीले अनंते' या न्यायाने कुणाला दोष न देता टाळ पिटत बसणे शिवाय पर्यायच उरत नाही. असा काहीसा प्रकार त्यामागील मला जाणवतो.

हा क्रान्तीकारी कार्यक्रम ठामपणे अंमलात आणण्यासाठी वटहुकूम काढून ताबडतोबीने देशात आणिबाणी जाहिर करून व आणखी कडक कायदे करून लष्करी शिस्तीने हे धोरण राबविले जाईल. ही आणिबाणी देशहितासाठी किमान १० वर्षे असेल. त्यामागे फक्त सत्ता टिकवून ठेवण्याचा दुष्ट हेतू मनात नसेल हे निश्चित, कारण ही कठोर राष्ट्रहिताची धोरणे कठोर शिस्ती शिवाय लागू होणार नाहीत हे पक्के लक्षात ठेवूनच अगदी लष्करी हुकुमतीवरच हे घडवून आणून १० वर्षानंतर ती अंगवळणी पडल्यावरच बंधने हळूहळू शिथील केली जातील, यासाठी घटनेतसुद्धा योग्य त्या सुधारणा किंवा गरज वाटल्यास भारताची संपूर्ण घटनाच नवीन तयार करावी लागणार हेही गृहीत धरले आहे.

अशाप्रकारे पहिल्या किसान दशकात शेतीव्यवसाय जर सबळ झाला तर पुढील काळात शेतीसाठी उभारलेल्या खास यंत्रणेत (खरेदी-विक्री) कपात करून हळूहळू योग्य काळात ती बंद केली जाईल. तसेच व्यापारी क्षेत्रावरील निर्बंधदेखील सैल केले जातील. परन्तु पाहिजे तशी प्रगती व परिस्थिती न आढळल्यास त्यापुढील किसानदशकाचीसुद्धा घोषणा करण्यात येईल.

सदरच्या कार्यक्रमाची योग्य व चोख अंमलबजावणी होण्यासाठी सदर कार्यक्रम जाहिर होण्याआधीच राष्ट्रपती व पंतप्रधानांचे कार्यालय, अर्थखात्याचे व संरक्षण, गृह, कृषी व उद्योगखात्यासारखे सर्व प्रमुख कार्यालयातील उच्चस्तरीय अधिकाऱ्यांना बदलून योग्य माणसे त्या ठिकाणी नेमली जातील व ह्यांना व या कार्यक्रमाला विरोध करणाऱ्या सर्व नेत्यांना रासुकाखाली कडक देखरेखीखाली योग्य ठिकाणी बसविले जाईल व त्यांचे 'ब्रेनवॉशींग' केले जाईल.

● ●

# ‘माजघर शेती’ प्रदर्शन

‘माजघर शेती’ संबंधीचे एक प्रदर्शन लवकरच भरणार आहे.

हे प्रदर्शन मे महिन्याच्या शेवटास किंवा जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात भरवण्याची योजना आहे. शक्य झाल्यास रविवार दि. ३१ मे १९९२ रोजी हे प्रदर्शन व्हावे अशी इच्छा आहे.

प्रदर्शन कोठे भरवावे? जानेवारी महिन्यात जिल्हा पातळीवर शेतकरी महिला आघाडीने ‘माजघरशेती’ प्रदर्शने भरविली होती. त्यावेळी सर्वांत जास्त उत्साह विदर्भात आणि त्यातल्या त्यात अकोला, वर्धा, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, नागपूर या जिल्ह्यांत आढळून आला व तेथील प्रदर्शने खूपच यशस्वी झाली. मराठवाड्यातही लातूर आणि परभणी जिल्ह्यांतील प्रदर्शने चांगली यशस्वी झाली. प्रदर्शनाकरिता पदार्थ तयार करणाऱ्यांच्या सोयीने पाहायचे झाले तर महाराष्ट्रव्यापी प्रदर्शन वाशीम, अकोला अशा एखाद्या ठिकाणी घ्यावयास पाहिजे. पण, येत्या प्रदर्शनाचा हेतू जानेवारी महिन्यातील जिल्हावार प्रदर्शनांपेक्षा काहीसा वेगळा आहे. जिल्हा प्रदर्शने स्वतःची कर्तबगारी स्वतःच अजमावून पाहण्याकरिता भरवली होती. येते महाराष्ट्रव्यापी प्रदर्शन आपले कौशल्य देशातील आणि परदेशातील व्यापारपेठेत प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने उचललेले पहिले पाऊल असेल. देशातील व परदेशातील व्यापाराशी संबंधित असलेल्या काही निवडक संस्था आणि व्यक्ती यांना या प्रदर्शनास येण्यासाठी विशेष निमंत्रण देण्यात येणार आहे. आपले कौशल्य त्यांच्यासमोर मांडता येईल, तसेच त्यांच्याकडूनही पदार्थांच्या कृती, आवेष्टन (पॅकिंग) इत्यादी गोष्टींबद्दल सूचना मिळू शकतील. काही प्रमाणात का होईना, मालाकरिता निश्चित मागण्या या प्रदर्शनाच्या वेळी नोंदविता याव्यात अशी अपेक्षा आहे.

म्हणजे, पदार्थ तयार करणाऱ्यांपेक्षा पदार्थांची मागणी करणारांना या प्रदर्शनात जास्त महत्त्व राहणार आहे. त्यामुळे त्यांची सोयगैरसोय प्रदर्शनाची जागा ठरविण्याच्या दृष्टीने जास्त महत्त्वाची. या दृष्टीने, शक्यतो मुंबई येथे अनुरूप अशी जागा मिळाल्यास हे प्रदर्शन भरविले जाईल.

या प्रदर्शनात चार प्रकारच्या वस्तू ठेवता येतील.

१. ताजा भाजीपाला, फुले, फळफळावळ;
२. प्रक्रिया केलेल्या भाज्या व फळे.
३. वेगवेगळ्या माजघर-पाकक्रिया (उदा. शेवया, सांडगे, कुरडया, पापड, लोणची इत्यादी.)
४. तयार खाद्यपदार्थ (उदा. मांडे, वडे, करंज्या, अनारसे इत्यादी)

जिल्हा प्रदर्शनांच्या वेळी असा अनुभव आला की सुंदर सुंदर पदार्थसुद्धा साधारण प्लास्टिकच्या किंवा इतर वेष्टणात कसेबसे बांधून आणले होते. या वेळी आपला माल बाहेरच्यांना दाखवायचा आहे; त्यामुळे आवेष्टन (पॅकींग) अधिक काळजीपूर्वक व सुबक व्हायला पाहिजे. यासाठी प्रदर्शनाच्या जागी प्लास्टिक पिशव्या, त्या सीलबंद करण्याचे यंत्र, निर्वात पिशव्या बंद करण्याचे यंत्र, नायट्रोजन भरून पिशव्या बंद करण्याचे यंत्र, अत्यंत बारीक दळण्याचे यंत्र (पल्वरायझर), पदार्थ पिशवी/डबाबंद करण्याआधी शीतकरण (प्री-कूलिंग) करण्याचे यंत्र इत्यादी उपकरणे ठेवली जातील. आपला माल या उपकरणांच्या साहाय्याने अधिक प्रदर्शनीय व टिकाऊ करून ठेवता येईल. (उदाहरणार्थ, भाजीपाला, फळेफुले निर्वात किंवा नायट्रोजनयुक्त पिशव्यांत दीर्घकाळ टिकू शकतात.)

माजघर-पाकक्रियेचे पदार्थसुद्धा व्यवस्थित वेष्टनात ठेवल्यास त्यांची तूटफूट होत नाही व ते आकर्षकही दिसतात.

या प्रदर्शनात केवळ तयार वस्तू मांडणे एवढी मर्यादित योजना नाही. या पदार्थांच्या सोबतच ते तयार करण्याचे प्रात्यक्षिक सतत दाखवावे अशी अपेक्षा आहे. प्रात्यक्षिकाकरिता लागणारी साधनसामुग्री अत्यंत स्वच्छ व चकचकीत असली पाहिजे. व सोबतच पाककृतीही थोडक्यात लेखी स्वरूपात देता आली तर अधिक फायदा होईल.

या प्रदर्शनाच्या वेळी फोटो व फिल्म काढण्यात येतील व त्यांच्या सहाय्याने पुढे विक्रीकरिता लागणारे प्रचारसाहित्य तयार केले जाईल. प्रदर्शनात वस्तू मांडणाऱ्या व त्या बनविण्याचे प्रात्यक्षिक दाखविणाऱ्या सर्वांचे पोषाखही साधे पण अत्यंत निर्मळ व स्वच्छ असणे अत्यंत आवश्यक आहे; नाही तर, मालाला गिऱ्हाईक मिळणे कठीण जाईल. पदार्थ प्रदर्शनात मांडण्याआधी त्यांच्या गुणवत्तेची तपासणी केली जाईल. तपासणीअंती गुणवत्तेत कमतरता आढळून आल्यास तसे पदार्थ प्रदर्शनात मांडण्याची परवानगी मिळणार नाही.

या ‘माजघर शेती’ प्रदर्शनाविषयी अधिक माहिती त्यात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांना येत्या काही दिवसांतच कळविली जाईल. या प्रदर्शनाच्या निमित्ताने होणारा प्रवासखर्च, शहरातील राहाण्याचा खर्च ज्याने त्याने स्वतःच करावयाचा आहे. शिवाय, प्रदर्शनातील जागा व मांडामांडीची साधने - टेबले, खुर्च्या, मंडप इत्यादी - यांसाठी होणाऱ्या खर्चालाही त्या त्या प्रमाणात हातभार लावावा लागेल. या प्रदर्शनातील चारपैकी कोणत्याही विभागात भाग घेण्याची इच्छा असणाऱ्या सर्व भावाबहिणींनी आपले नाव तातडीने खालील पत्त्यावर कळवावे.

**‘माजघर शेती’ प्रदर्शन कार्यालय,**
अंगारमळा
मु. पो. आंबेठाण (४१०५०१)
ता. खेड जि. पुणे.

**नाव नोंदवितांना द्यावयाचा तपशील -**

नाव, गाव, पोस्ट, तालुका, जिल्हा, टेलिफोन क्रमांक (तातडीच्या संपर्कासाठी); प्रदर्शनात मांडावयाच्या वस्तूंचे विवरण, प्रात्यक्षिक दाखविण्याची शक्यता आहे का? प्रात्यक्षिकास आवश्यक व्यक्तींची संख्या, इत्यादी..

**‘माजघर शेती’ प्रदर्शन कार्यालय.**

# सप्तदोषाने ग्रासलेली कापूस योजना बंद झालेलीच बरी

**श्री. वा. दराडे,** मु. तढेगांव (बुलढाणा)

एकाधिकार कापूस खरेदी योजना शेतकऱ्यांवर लादून ती राबविणारे महाराष्ट्र हे देशातले एकमेव राज्य आहे. सुमारे वीस वर्षांपूर्वी जेव्हा ही योजना सुरू केली गेली तेव्हा खाजगी खरेदीदारांच्या खरेदीवर बंदी आली तेव्हा आपोआपच शेतातील कापूस चोरी जाण्याचे प्रकार थांबले व शेतकरी शेतीचे राखण करण्याच्या बाबतीत निश्चित झाला. खाजगी व्यापारी पैसे चुकते करताना जरा टाळाटाळी करीत होते, हेही योजनेमुळे बंद झाले. या आणि अशाच काही बारीक सारीक गोष्टी त्यावेळी शेतकऱ्यांना बऱ्या वाटल्या होत्या व म्हणून शेतकऱ्यांनी या योजनेचे स्वागत केले होते.

पण पुढे 'एकाधिकार' या शब्दातील भयानकता हळूहळू प्रगट होऊ लागली. 'एकाधिकार' म्हणजे फक्त सरकारने कापूस खरेदी करायचा, तेवढाच अर्थ न राहता एकाधिकार म्हणजे शेतकऱ्यांबरोबर कसेही वागायचे, कितीही कमी भाव देऊन त्यांना लुटायचे, नोकरशाहीने कितीही पैसे खायचे असा अर्थ झाला. सरकारला व नोकरशाहीला जणू या योजनेने शेतकऱ्यांचे शोषण करायचा 'एकाधिकार' बहाल केला. यामुळे महाराष्ट्रातला कापूस उत्पादक शेतकरी सतत नागवला जात आहे व नको ही 'सरकारी एकाधिकार योजना' असे आज तोही म्हणू लागला आहे.

तशी ही योजना सरकारने जर शेतकऱ्यांच्या हिताच्या हेतूने इमानदारीने राबविली, तर चांगलीच आहे. 'नफा शेतकऱ्यांच्या व तोटा सरकारचा' या आपल्या वचनाला जागून सरकारने जर रूई, सरकी यांची फायदेशीर विक्री केली व खर्च वजा जाता उरलेला नफा शेतकऱ्यांना वाटला, तर त्यातून शेतकऱ्यांचा विकासच होणार आहे. पण तसे झाले असते तर ही योजना डबघाईस कशाला आली असती? न परवडणारे व अन्यायकारक भाव शेतकऱ्यांना कशाला मिळाले असते?

खरे म्हणजे महाराष्ट्र सरकारने कापसाची 'एकाधिकार खरेदी' सुरू केली, ती शेतकऱ्यांच्या हितासाठी नव्हेच. कापूस हे विदर्भ-मराठवाड्यात पिकणारे पांढरे सोने होय. कापसाच्या या अतिशय फायद्याच्या धंद्यात खाजगी व्यापारी गब्बर होत आहेत, ही गोष्ट आपल्या सरकारने हेरली व आपण या धंद्यात पडून मलिदा का लुटू नये असा सरळ सरळ व्यवहारी विचार सरकारने केला व योजना सुरू केली. आव मात्र आणला शेतकऱ्यांच्या कल्याणाचा, शेतकऱ्यांना व्यापाऱ्यांच्या मिठीतून सोडविण्याचा. अन् डाव टाकला त्यांना आपल्या पंज्यात अडकविण्याचा.

कसे कसे डाव टाकले या सरकारने शेतकऱ्यांचे हे पांढरे सोने लुटण्यासाठी? पहिला डाव होता भांडवल उभारणी निधीचा. एकाधिकार योजना आखून कापसाचा व्यापार करायचा. पण लागणारे भांडवलही शेतकऱ्यांकडूनच कपात करून उभारायचे असे हे अजब प्रकरण. 'जिसकी लाठी उसीका सर' या नमुन्यात मोडणारे.

दुसरा डाव होता चढउतार निधीचा. कापसाच्या नफ्यातून २५ टक्के चढउतार निधी कपातीचा अत्यंत अन्यायकारक कायदा या योजनेला लागू आहे. कापूस योजनेची हमी किंमत कमी असते. या कमीतकमी किंमतीपेक्षा बाजारात कमी भाव झाले तर भारत सरकारने समर्थन मूल्यात शेतकऱ्यांचा सर्व कापूस खरेदी करावा, असा जर या हमी किंमतीचा अर्थ असेल तर मग कापसाच्या तोट्याची भरपाई करण्यासाठी चढउतार निधी २५ टक्के कापण्याची गरज काय? पण हा क्रूर कायदा कायमचा शेतकऱ्यांच्या बोकांडी या योजनेने बसविला आहे. या कायद्यान्वये सुमारे ३९४.४९ कोटीचा तोटा शेतकऱ्यांकडून वसूल होत आहे. चालू साली आपले ५१ कोटी यात गेले आहेत.

अशी ही शेतकऱ्यांना लुटणारी योजना. १९७८ साली शरद पवारांनी, आपल्याला शेतकऱ्यांविषयी फारच तळमळ लागून राहिली आहे, हे दाखविण्यासाठी शेतकऱ्यांचे आपण कैवारी आहोत असा भाव आणून सुधारित कापूस खरेदी एकाधिकार योजना आखली होती. त्या काळचे सहकारमंत्री श्री एन. डी. पाटील यांनी घोषणा केली होती की, १) चढउतार निधीसाठी फक्त ५ टक्के कपात केली जाईल, २) भांडवल उभारणीसाठी फक्त १ टक्का कपात होईल, ३) एकधिकारातली हमी किंमत कृषिमूल्य आयोगाने जाहीर केलेल्या किमतीपेक्षा २० टक्क्यांनी जास्त राहील. पण वरील सर्व घोषणा फोल ठरल्या. शेतकऱ्यांच्या हितकर्त्याचा आव आणणाऱ्या मुख्यमंत्र्यांनीच या चांगल्या सुधारणा पायदळी तुडवल्या. का? कारण की, त्या शेतकऱ्यांच्या हिताच्या ठरू शकल्या असत्या. एन्. डी. पाटलांनी विधानसभेत अशी घोषणा केली होती की, योजनेचा मागील तोटा पुढील नफ्यातून वसूल करायचा नाही, पण वसुली अजून सुरूच आहे. नको ती एकधिकार योजना असे नाईलाजाने शेतकऱ्याला म्हणायला भाग पाडणारी ही झाली सरकारची शेतकरी विरोधी, लुटीची धोरणे.

'भारतीय ॲग्रो एकॉनॉमिक रिसर्च सेंटर दिल्ली' चे प्रा. शरद केळकर यांनी तरूण भारतात एक छोटासा लेख लिहून कापूस एकाधिकार बंद होणार का, असा प्रश्न उपस्थित केला आहे. या लेखात श्री. केळकरांनी म्हटले आहे की, ३०-७-९१ पर्यंत एकूण एकाधिकार योजनेचा हिशोब पाहता ९०० कोटी शेतकऱ्यांना योजनेकडून घेणे आहेत. भारतीय किसान संघाने हा हिशोब मांडून ते पैसे परत मिळविण्यासाठी कोर्टाकडे धाव घेतली आहे.

शेतकऱ्याच्या लुटीची कायदेशीर व्यवस्था करून ठेवणाऱ्या महाराष्ट्र सरकारने योजनेतील कर्मचाऱ्यांनाही मन मानेल तसे वागायला जणू मोकळे सोडले आहे व त्यामुळे योजनेच्या एकूण कारभारात भ्रष्टाचाराचे थैमान माजले आहे. साध्या हमालापासून थेट ग्रेडरपर्यंत सर्वजण, आपले खिसे भरण्यात गुंतले आहेत. कापूस संकलन केंद्रावर फेरफटका मारला तर

(पान ६ वर पहा)

# कर्मकथा -
# स्त्रीजीवनाच्या

१५ मार्च १९९२ रोजी उदगीर तालुक्यातील किणी यल्लादेवी येथे शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीचे आम्ही कार्यकर्ते गेलो होतो. तेथे झालेल्या सभेत आम्ही शेतकरी संघटनेच्या चतुरंग शेतीच्या कार्यक्रमाची माहिती दिली. जेव्हा आम्ही शेतकरी महिला आघाडीच्या लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमाची माहिती सांगत होतो तेव्हा सभेच्या एका कोपऱ्यातील काही बायांच्या डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहात होते. त्या बाया अक्षरशः रडत होत्या. मी सभा संपता संपता त्यांच्या जवळ जाऊन बसले व त्या का रडतात याची चौकशी केली. पण मनावर कसले तरी दडपण असल्यागत आधी त्या बोलायलाच तयार नव्हत्या. हळूहळू एकेक जण बोलायला लागली. बाकीजणी घोळका करून ऐकत राहिल्या. ऐकणाऱ्यांतल्या कितीकांच्या डोळ्यात दिसत होत की, 'ती सांगते आहे ते माझंच दुःख आहे.' ३०/३५ च्या त्या घोळक्यातल्या आठजणीच बोलल्या. त्यांनी सांगितलेल्या त्यांच्या जीवनाच्या या कर्मकथा आहेत.

### १. माहेरचा आधारसुद्धा उपकारबुद्धीचा

माझे लग्न १५ वर्षांपूर्वी झाले. लग्नाचे वेळी १४ हजार रुपये हुंडा दिला होता. तरीही सासरी खूप जाच व्हायला लागला. एके दिवशी सासरच्यांनी माहेरी आणून सोडले. पण माहेरच्या लोकांनी परत सासरी धाडले. पुन्हा जाच सुरू झाला. इतका की घरी एक घाससुद्धा गिळू नये असे वाटू लागले. महिनाभर शेतात काम करतांना कुठे जांब खा, केळी खा तर कधी शेजारीपाजारी भाकर मागून खा असे दिवस काढले. काम मात्र दिवसभर ढोरमेहनतीने करीत होते. पोटात भुकेचा जाळ उठायचा. अशा हालात असतांनाच एके रात्री झोपेत असतांना अंगावर काहीतरी पडले असे वाटून जागी झाले तर समोर नवरा व सासू हातात रॉकेलचा डबा व काड्याची पेटी घेऊन उभे होते. त्यांनी माझ्या अंगावर रॉकेल ओतले होते. मी आरडाओरडा केला. खूप लोक जमले पण न्याय करायला कोणीच तयार नव्हते. माहेरी कळवले व मी माहेरी परतले. कोर्टात केस केली. त्यामुळे १० एकर जमीन माझ्या हिश्शाला येत होती. थोड्याच दिवसांत जमीन तळ्यात गेली. त्याचे कोर्टाच्या मदतीने १६ हजार रुपये मिळाले. सगळे पैसे आईवडिलांनी भावाच्या नावावर ठेवले. माझ्या नावावर का नाही विचारता इतके दिवस कोणाच्या जिवावर जगलीस म्हणून विचारतात. सासरच्या पैशांचा आधार नाही आणि माहेरी राहात असले तरी आज मला माहेरचाही आधार नाही.

### २. रोजची मारझोड आणि उपासमार

माझे लग्न वयाच्या चौदाव्या वर्षी झाले. माझ्या मालकाला दीड हजार पगार आहे, घरी जमीन नाही. मला एक मुलगा व दोन मुली आहेत. नवरा सगळा पैसा दारूत घालवतो, मागे शिल्लक काहीच ठेवत नाही. मारझोड तर रोजचीच आहे. चारचार दिवस लेकरं पोटाशी घेऊन अर्धपोटी झोपी जाते. नवरा माझ्या तीन लेकरांना व मला कुलूप घालून घरात कोंडून ठेवतो. दोन दोन दिवस कुलूप काढत नाही. उपाशीतापाशी दिवस काढण्यापेक्षा विष पिऊन मरून जावे असे कधी कधी वाटते, पण लगेच लेकरं डोळ्यासमोर येतात.

### ३. मजुरी करून मुलांना मोठे करीन

माझे लग्न वयाच्या १७ व्या वर्षी झाले. सासरच्या जाचामध्येच दोन मुले झाली. एकदा मी व मुले झोपेत असतांना सासरच्यांनी आमच्या अंगावर तेजाब टाकले व दारासमोर अंबाडा पेटवला आणि माहेरी कळविले. वडील येऊन दवाखान्यात घेऊन गेले. तेव्हा डॉक्टरने सांगितले की अंगावर तेजाब टाकले आहे. आता सध्या माझ्या व मुलांच्या अंगावर मोठमोठे फोड आहेत. मला चुलीपुढे बसून स्वयंपाक करणे व जीव जाणे बरोबर वाटते. अंगाची आगआग होते. आता सासरचे लोक परत न्यायला तयार आहेत पण मी जायला तयार नाही. माझा व मुलांचा जीव वाचला हेच मी माझे भाग्य समजते. माहेरी पोसवेना झाले तर माझी मी मजुरी करून मुलांना मोठे करणार पण सासरी परत जाणार नाही.

### ४. सहा वर्षांत सुखाचा एकही दिवस नाही.

माझ्या मालकाचे एकदा लग्न झाले होते. पण आठ एकर जमीन व लाईनमनची नोकरी होती हे पाहून माझ्या आईवडिलांनी मला तिथे दिले. लग्न झाल्यावर मला कळले की यांच्या वाईट वागणुकीमुळे त्यांच्या पहिल्या बायकोने त्यांना सोडून दुसरे लग्न केले होते. माझे लग्न होऊन सहा वर्षे झाली. मार तर दररोज चालू आहे. मालकांनी सर्व जमीन विकली, नोकरी सोडली. मला दोन लेकरं आहेत. त्यांच्यासाठी मोलमजुरी करूनसुद्धा मालक पोटभर खाऊ देत नाही. आता माहेरी कुणीच नसल्याने कसला आधारच राहिला नाही. सहा वर्षांच्या या जीवनात सुखाचा एक दिवससुद्धा गेला नाही. यापुढे काय करावे, विचार पडतो.

### ५. लोकांच्या दारात राबल्याने जातीची प्रतिष्ठा जात नाही, पण -

माझे लहानपणीच लग्न झाले. लग्न झाल्यापासून मी माहेरीच आहे. आज माझे वय ४० वर्षे आहे. शहाण्णव कुळी मराठ्याच्या मराठ्याच्या घरी जन्मल्याने दुसरे लग्न करता येत नाही. लोकांच्या दारात राबून जन्माचं चीज नाही.

### ६. अर्धी भाकरी का असेना, सुखाची आहे.

माझे पहिले लग्न १० हजार रूपये हुंडा देऊन केले. पण हुंडा घेऊनही माहेराहून ५ हजार रूपये आण म्हणून सासरचे लोक मारहाण करायला लागले. बापाची परिस्थिती विकट असल्याने ते काही पैसे देऊ शकले नाहीत. दिवसभर काम करून वर मार चालूच. पैसे मिळत नाहीत म्हटल्यावर सासरच्यानी मला माहेरी पाठवले व नवऱ्याने दुसरे लग्न केले. वडिलांनी सोडचिठ्ठी करून माझेपण दुसरे लग्न केले - पाच हजार रूपये हुंडा देऊन. पहिले तीन महिने घरातले सगळे चांगले वागले. पण नंतर, तुला पहिल्या घरून का सोडले असे म्हणून मारहाण करायला लागले आणि एके दिवशी माहेरी आणून सोडले. परत जर आलीस तर जिवंत राहाणार नाहीस असे म्हणून ते मला सोडून गेले. आता माझ्या आईवडिलांनी, तिसऱ्या वेळी मला एका शेतमजुराला दिले. नवऱ्याची मजुरी २० रुपये आणि माझी १० रुपये, अशा तीस रुपयांमधे दोघांचे जीवन आनंदात जाते. अर्धी

भाकरी असेना का पण ती सुखाची आहे. मला आता एक मुलगा झाला आहे. आम्ही सर्व आनंदात आहोत.

### ७. जीवनाचे वाटोळे झाले,

नोकरीवाला जावई हवा म्हणून, मजुरी करणाऱ्या माझ्या आईवडिलांनी १३ हजार रूपये हुंडा देऊन माझे लग्न केले. पाच वर्षे नांदले, मारहाण सहन करीत. माहेरी जा, परत येऊ नको, तू मला पसंत नाहीस असं सतत म्हणायचे. पुढे तर म्हणायला लागले मी तुला 'बेपत्ता' करून टाकीन. शेवटी मी जिवाला भिऊन माहेरी आले. मालकांनी दुसरे लग्न केले. मी कोर्टात दावा दिला. आता पोटगी मिळते. पण त्याचा काय उपयोग? माझ्या जीवनाचे वाटोळे झाले आहे. बाईच्या जन्माला आले म्हणून स्वतंत्र जगण्याची पात्रता नाही असे वाटू लागले आहे.

### ८. माहेरचा भक्कम आधार मिळाल्याने हाल तरी वाचले.

माझे लग्न होऊन अठरा वर्षे झाली असतील. सासरी सात वर्षे नांदले. रात्र, दिवस, पहाट हे काहीच कळत नव्हतं. खूप काम करायला लावायचे. क्षणसुद्धा बसायला वेळ नसे. पोटावर राबल्यासारखी स्थिती. १९ वर्षे वयाची मी ७० वर्षे वयाच्या म्हातारीसारखी दिसायला लागले. सात वर्षे नांदलेल्या माझी ही कळा पाहून माझे आईवडील व भावांनी मला माहेरी आणले. माहेरीपण बसायला वेळ मिळत नाही. पण आपल्या जन्माची कथा आपल्याच मनाला सांगत बसायची, त्याला इलाज काय? आज अकरा वर्षे मी माहेरीच आहे. भावाच्या बरोबरीने मलाही पाच एकर जमीन मिळाली आहे. त्यामुळे तशी काळजी नाही. पण माझ्या सारख्याच सोडल्या गेलेल्या अनेक बहिणींचे कुत्र्यासारखे हाल होतात त्यावर उपाय काय?

संकलन : **कु. अवंतिका पाटील,**
मु. पो. चिघळी ता. उदगीर, जि. लातूर

---

(पान ४ वरून)

अनेक प्रकारांनी तिथे आर्थिक गैरप्रकार घडताना दिसतात. पैसे चारले की कापसाचे वजन वाढते, कापसाची ग्रेडही पैसे दिले की बदलू शकतो, पैसे न देणाराचा चांगला कापूसही खराब ग्रेडमध्ये घालून 'पैसे देणे अनिवार्य' केले जातात. कापूस वाढविण्याचे पुरेसे प्रकार झाले की मग गंजीचा निश्चित हिशोब व्हायच्या अगोदरच गंजीला आगही लागते. शेतकऱ्यांच्या लहानशा घरात अगदी चुलीपाशी कापूस असतो तरी कधी पेटत नाही, मात्र फेडरेशनमध्ये गेला की, हाच कापूस इतका 'ज्वालाग्राही' का बनतो, याचे उत्तर या भ्रष्टाचारातच सापडते. पुढे कापूस गाठींची गोदामेही पेटतात, त्याचेही कारण हेच.

या आणि अशा अनेक प्रकारांनी भ्रष्टाचार या योजनेत ठायी ठायी दिसून येतो आणि याचा परिणाम बिचाऱ्या शेतकऱ्यांना भोगावा लागतो.

कापूस एकाधिकार खरेदी योजना चालू ठेवावी की बंद करावी, अशी चर्चा आज सुरू झालेली दिसते. केंद्र सरकाचेही म्हणणे असेच आहे की महाराष्ट्र सरकारने ही योजना बंद करावी. कापूस एकाधिकार योजनेचा एकूण आजवरचा तोटा ४७२.२२ कोटी रुपये आहे व शेतकऱ्यांनाही योजनेने समाधान दिलेले नाही, असे इंडियन एक्सप्रेसने आपल्या एका वार्तापत्रात म्हटले आहे.

विचारांती असेच म्हणावेसे वाटते की, महाराष्ट्र सरकारची ही एकाधिकार योजना बंद झालेलीच बरी. शेतीचा व्यवसाय तोट्याचा आहे हे निर्विवाद. पण कापसाचा, या पांढऱ्या सोन्याचा व्यापार मात्र निश्चितच तोट्याचा होऊ शकत नाही. आपल्या सरकारने मात्र एकाधिकार योजनेमार्फत हा व्यापार ४७२ कोटी तोट्याच्या खड्ड्यात लोटण्याची करामत करून दाखविली आहे. याला कारण एकच - शासन व शासकीय यंत्रणा (नोकरशाही) यांनी चालवलेला पराकोटीचा भ्रष्टाचार व उधळपट्टी.

ही योजना बंद व्हावी असे वाटण्याचे कारण या योजनेत खालील प्रमाणे दोष आहेत.

१. भांडवल उभारणी निधी कपात असमर्थनीय आहे. ती १ टक्क्यांवरून ३ टक्क्यावर गेली व पुढे ५ टक्क्यांवर जाण्याची भीती आहे.

२. चढउतार निधी २५ टक्के कापणे म्हणजे शेतकऱ्यांवरील अन्यायाची परिसीमा होय.

३. कृषिमूल्य आयोगाने जाहीर केलेल्या किंमतीपेक्षा २० टक्के अधिक किंमतीचे १९७८ चे आश्वासन फोल ठरले.

४. भ्रष्टाचाराचा राक्षस योजनेला तोटा देतो व योजना मग शेतकऱ्यांना नाडते.

५. व्यापाऱ्यांना फायद्याचा होणारा कापसाचा व्यापार एकाधिकाराने तोट्याचा करून एक विक्रम नोंदविला.

६. शेतकऱ्यांचे हित करण्याचा गाजावाजा करीत आलेली योजना शेतकऱ्यांना रास्त भाव देऊ शकली नाही व ते पांढरे सोने शेतकऱ्यांचे डोळे पांढरे करणारे ठरले.

७. परप्रांतात आपल्यापेक्षा जास्त भाव आहे, सी. सी. आय. सुद्धा जास्त भावाने खरेदी करते, हे सर्व आपली योजना कबूल करते. पण तो भाव मात्र शेतकऱ्यांना देत नाही, एवढी तिने लाज सोडली आहे.

वरील दोषांचे ग्रहण योजनेला लागले आहे. शेतकऱ्यांचे हित या सप्तदोषांनी ग्रासले आहे. या योजनेतील सापळ्यात अडकलेला शेतकरी एकदाचा सुटला तर बरे हाईल. कापूस खरेदीत अनेक स्पर्धक उभे राहिले, कापूस निर्यातीला चालना मिळाली तर शेतकऱ्यांनाही फायदा मिळेल व आर्थिक आपत्तीत अडकलेला आपला देश मोकळा व्हायलाही मदत होईल.

पण महाराष्ट्र सरकार ही कामधेनू (सरकारसाठी) ठरणारी योजना सहजासहजी सोडील असे म्हणता येत नाही. लवकरच जी चर्चा होऊ घातली आहे, तीत अनुकूल अभिप्राय मिळविणे सरकारला कठिण नाही. तसे झाले की शेतकऱ्यांना भरडायला 'एकाधिकाराचा वरवंटा' पुन्हा कायमच.

तरुण भारत २३/४/९२ वरून साभार

**भीक नको घेऊ घामाचे दाम**
चतुरंग शेती सीताशेती माजघरशेती व्यापारशेती निर्यातशेती

# सीताशेती

**प्रयोगसूत्र ३ :**

**उपजाऊ माती तयार करणे**

प्रयोग सूत्र १ मध्ये कचरा गोळा करणे व कचरा कुजविणे (शेतकरी संघटक ६ डिसेंबर १९९१) व प्रयोग सूत्र २ मध्ये पूर्ण कुजलेले घटक गोळा करणे. (शेतकरी संघटक २१ डिसेंबर १९९१) यासंबंधी माहिती दिली होती. ही प्रयोगसूत्रे 'प्रयोग-परिवार' च्या प्रयोगांवर आधारित आहेत.

एक गुंठा जमिनीवर या प्रयोगसूत्रांप्रमाणे प्रयोग करावयाचा म्हटले तर सर्व मिळून ५०० किलो पूर्ण कुजलेला कचरा आवश्यक आहे. ज्यांनी डिसेंबर महिन्यापासून कचरा गोळा करून कुजविण्यास सुरुवात केली असेल त्यांना ५०० किलो पूर्ण कुजलेला कचरा जमवणे शक्य झाले असेल. पूर्ण कुजलेला कचरा कसा ओळखू येतो ते प्रयोगसूत्र १ मध्ये दिलेले आहे - पूर्ण कुजलेले पदार्थ हलके, काळे व तेलकट असतात, पाणी घेतल्यानंतर जड होतात व ओल लवकर सोडत नाहीत.

पावसाळा जवळ आला आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला, ज्या कोणत्या पिकाचा प्रयोग करावयाचा आहे त्याची लागवड/पेरणी करावी लागणार आहे. त्या आधी जमिनीवर उपजाऊ माती तयार करणे आवश्यक आहे.

**उपजाऊ (नर्सरी) माती कशी तयार करावी?**

ज्या जमिनीवर (१ किंवा २ गुंठे) प्रयोग करावयाचा आहे त्या जमिनीवरील एक ते दीड इंच थरातील माती 'खरवडून' एकत्र गोळा करावी. या मातीचे आकारमान (वजन नव्हे) या जागेसाठी बनविलेल्या पूर्ण कुजलेल्या पदार्थाच्या आकारमान इतके साधारणपणे असेल. ही माती आणि कुजलेले पदार्थ एकत्र मिसळून त्यात अंदाजे विसावा भाग काटक्याकुटक्यांची राख घातली की आपल्या प्रयोगासाठी लागणारी उपजाऊ माती तयार झाली. माती खरवडून गोळा करण्यासाठी कुदळी किंवा खुरपे यांसारखे औजार वापरले तरी चालेल, पण जमीन नांगरू नये.

या पुढील भाग म्हणजे प्रयोग म्हणून आपण जे पीक घेणार आहोत त्या पिकाच्या दृष्टीने जमीन तयार करणे. जमीन कशी तयार करावयाची ते पुढील सूत्रात पाहू.

**टीपा :**

१. प्रयोग-परिवारच्या प्रयोगांनुसार पिकाच्या वाढीसाठी माती, पाणी यांपेक्षाही सूर्यप्रकाश अधिक महत्त्वाचा आहे. तुम्ही प्रयोगासाठी निवडलेली जमीन ढगाळ वातावरण सोडता इतर वेळी सूर्यप्रकाशाचा पूरेपूर लाभ मिळवणारी असली पाहिजे.

२. ज्यांना हे प्रयोग करण्याची इच्छा आहे पण ज्यांनी अजून कचरा गोळा करून कुजविण्यास सुरुवात केली नसेल ते थोडा अधिक वेळ देऊन पूर्ण कुजलेला तयार कचरा गोळा करून या प्रयोगात सामील होऊ शकतील.

३. हे प्रयोग करणे म्हणजे काही तरी चमत्कार करून दाखविणे अशी या मागची भूमिका नाही. त्यामुळे प्रयोग करतांना वापरलेल्या औजारांचा खर्च, श्रम तास इत्यादींचा तंतोतंत हिशोब ठेवला पाहिजे.

४. या सदरात दिलेली सूत्रे आणि त्या आधारे केलेले प्रयोग म्हणजे पूर्णांशाने 'सीताशेती' नव्हे. हा 'सीता शेती' तला एक प्रयोग आहे. याहून वेगळ्या पद्धतीने प्रयोग करून बाह्यसामुग्रीवर अवलंबून नसलेल्या शेतीचे प्रयोग जे कोणी करीत असतील त्यांनी आपली पद्धती, अनुभव त्यातील आर्थिक हिशोबासहित कळवावे. त्यांचे अनुभव 'सीताशेती' चे प्रयोग करणाऱ्या शेतकरी भावाबहिणींना निश्चितच मार्गदर्शक ठरतील.

५. अनुभवांच्या देवाणघेवाणीतून होणाऱ्या चर्चेनेच हे सदर बाळसे धरू शकेल.

प्रतिनिधी,

**कृषि अर्थ प्रबोधिनी**

# सीताशेती पत्रव्यवहार

## गावोगाव सीताशेती प्रयोग आवश्यक

स. न. वि. वि.

'सीताशेती' प्रयोग जर योग्य रितीने हाताळला तर कोरडवाहू शेतीतील उत्पादन वाढविता येईल असा माझा विश्वास आहे.

मी आपल्या या कार्यक्रमाला हातभार लावण्याचे ठरविले आहे. उदगीर तालुक्यात किमान दहा-वीस खेड्यांत तरी 'सीताशेती' प्रयोग सुरू करण्याचा मी संकल्प केला आहे. त्यासाठी शेतकरी संघटनेच्या एखाद्या सक्रीय कार्यकर्त्याचे मला सहकार्य मिळावे अशी अपेक्षा आहे. माझ्याकडे मोटार सायकल आहे. मी दररोज एक तास वेळ देऊन संबंधित खेड्याला स्वखर्चाने जाऊन 'सीताशेती' प्रयोगाचा प्रसार करण्यास तयार आहे.

शेतकरी संघटनेचे बहुतांश कार्यकर्ते माझ्या ओळखीचे आहेत. परंतु, ते अशा प्रकारच्या विकासात्मक व रचनात्मक कार्याला वेळ देऊन सहकार्य करतील याबद्दल मला शंका आहे. म्हणून, या कार्यक्रमाच्या दृष्टीने एखाद्या सक्रीय कार्यकर्त्याचे नाव सुचवावे ही विनंती.

आपला,

२७/४/९२ **वीरप्पा तोळनवर**

'गोरक्षण', सोमनाथपूर

उदगीर (४३१५१७)

*स. न. -*

*धन्यवाद. आपले हे पत्र वाचून उदगीर तालुक्यातील काही कार्यकर्ते आपणाशी संपर्क साधतील असा विश्वास आहे. आपली तळमळ प्रशंसनीय आहे. आपले अनुभव अवश्य कळवावे ही विनंती.*

*प्रतिनिधी, कृ. अ. प्र.*

## कचरा उघडाच ठेवायचा का?

स. न.

शेतकरी संघटकच्या २१ मार्च ९२ च्या अंकात खताबाबत खुलासा विचारणारी तीन पत्रे वाचली. खुलासाही वाचला. या बाबतची आपली योजना वाचनात नसावी. आपले धोरणही अजून निश्चित दिसत नाही. प्रयोगच करतो तर काही दिशा दिसते आहे. खड्ड्यात दर आठवड्याला कचरा भरावयाचा आहे असे वाटते आहे. सुमारे ३५ किलोचे थर घ्यायचे का? या वजनाचा अंदाज बांधायला काही साधन आहे का? ओला

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 6th May, 1992

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926÷A83
May 6, 1992

**To**

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

कचरा, सुका कचरा यांचा मेळ कसा घालायचा? हे थर उघडेच ठेवले तर आतला ओलावा उडून जाईल. त्यावर मातीचा थर किंवा उष्णतेचे मंदवाहक झाकण ठेवले तर ओलावा व निर्माण होणारा वायू घालवायला प्रतिबंध होईल. का उघडाच कचरा पाहिजे?

खत बनविण्याची एक 'नॅडप' पद्धती आहे. यात खड्डा मात्र ४८ तासांत भरावा लागतो. थरांवर शेणकाळा व माती पसरावी लागते. ३-४ महिन्यांत संपूर्ण नत्र-स्फुरद-पालाशयुक्त, शिवाय सूक्ष्म पोषणद्रव्ये असलेले खत तयार होते मधून मधून पाणी मात्र खड्ड्यात सोडावे लागते.

आपला,

२-४-९२ **ह. धो. बागलकर**
पो. सावडाव ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग

*स. न.*

*या अंकात 'सीताशेती' सदराखाली दिलेल्या प्रयोगसूत्रांनुसार काडीकचरा खड्ड्यात गाडावयाचा नसून तो गठ्ठा बांधून मोकळ्या हवेत ठेवावयाचा आहे. यामागे शास्त्रसिद्ध कारण आहे. कचरा कुजविणाऱ्या जिवाणूंची साखळी कचऱ्यातील घटकांबरोबर हवेतील नायट्रोजनचा वापर करतात. कचरा खड्ड्यात दाबून त्याचा हवेशी संपर्क तोडला तर नायट्रोजनचा पुरवठा अपुरा होऊन कचरा कुजण्याची प्रक्रिया अत्यंत संथपणे होईल. म्हणून हा कचरा उघड्यावरच ठेवणे आवश्यक आहे. दुसरे, म्हणजे कचरा कुजतांना निर्माण होणारा वायु कचरा कुजण्यास उपयुक्त नसतो. उलट, तो निघून जाणेच श्रेयस्कर. आपण म्हणता त्याप्रमाणे ओलावा टिकवून ठेवण्यास थोडे अधिक प्रयत्न करावे लागतील एवढेच. 'नॅडप' पद्धतीचा आपण किंवा आपल्या परिसरात कुणी प्रयोग केला असल्यास त्या अनुभवांवर आधारित माहिती त्या प्रयोगाच्या अर्थशास्त्रासह अवश्य कळवा. प्रयोग करू इच्छिणाऱ्या शेतकरी भावाबहिणींना ती निश्चित मार्गदर्शक ठरेल.*

*आपला,*
*प्रतिनिधी, कृ. अ. प्र.*

# ● परिसंवाद ●
# 'लक्ष्मीमुक्ती' ने मला काय दिले?

शेतकरी महिला आघाडी व शेतकरी संघटनेच्या 'लक्ष्मीमुक्ती' कार्यक्रमाने संपूर्ण देशात खळबळ उडवून दिली आहे. वेगवेगळे कायदे झाले, असंख्य स्त्री-संघटनांनी चळवळी केल्या तरीही जे अशक्यप्राय राहिले ते महाराष्ट्रात राजीखुशीनेच नव्हे तर अहमहमिकेने होत आहे. आतापर्यंत दोन हजारांहून अधिक गावांतल्या प्रत्येकी शंभरावर पुरुषांनी आपल्या घरच्या लक्ष्मींना जमिनीची मालकी दिली आणि अल्पांशाने का होईना, ऋणमुक्त झाल्याचा आनंद मिळविला. गेल्या दीडदोन वर्षांत श्री. शरद जोशींनी या दोन हजार गावांपैकी साडेसहाशे गावांत जाऊन त्या गावांचा 'लक्ष्मीमुक्ती' चा अवलंब केल्याबद्दल जाहीर सन्मान केला. वेगवेगळ्या स्त्री-संघटनांच्या कार्यकर्त्या, नेत्या या कार्यक्रमाचा अभ्यास करू लागल्या आहेत. शासनानेसुद्धा अशा तऱ्हेने होणाऱ्या जमिनीच्या हस्तांतरणाला मान्यता देण्याचे तत्त्वतः मान्य केले आहे.

या सर्व गडबडीत, 'लक्ष्मीमुक्ती' ने मालकी हक्क मिळालेल्या मायबहिणींच्या व आपली पत्नी मालमत्ताधारक झाल्यामुळे आनंदित झालेल्या भावांच्या अनुभवांना व भावनांना नजरेआड करून चालणार नाही. किंबहुना, त्यांचे अनुभव व भावना 'लक्ष्मीमुक्ती' चा हा मंगल कार्यक्रम अधिक गतीमान व उत्स्फूर्त होण्यास उपयोगी ठरतील. म्हणून 'शेतकरी संघटक' लक्ष्मीमुक्तीत संपत्तीअधिकार मिळालेल्या मायबहिणी आणि हा कार्यक्रम स्वीकारून कृतार्थतेची भावना अनुभवणाऱ्या शेतकरी भावांसाठी हा परिसंवाद जाहीर करीत आहे-

**'लक्ष्मीमुक्ती' ने मला काय दिले?**

या परिसंवादाच्या दृष्टीने, किती जमीन मिळावी हा मुद्दा गौण आहे; महत्त्व आहे ते 'तुमच्या रोजच्या जीवनक्रमात काय काय बदल झाले' याला. तुम्हाला जे वाटते, जाणवते ते तुम्हाला जमेल तसे तुमच्या शब्दात लिहून/लिहवून पाठवा. तुमचे हे अनुभव इतर अनेक 'लक्ष्मी' ना संपत्तीअधिकार मिळवून देणारे आणि अनेक पुरुषांना त्यांच्यावर लादलेल्या अक्राळविक्राळ मुखवट्यातून बाहेर पडायला मदत करणारे ठरतील.

आपले अनुभव कळवितांना आपले संपूर्ण नाव, गाव, पत्ता व शेतकरी संघटनेशी संबंध वगैरे माहिती अवश्य लिहावी. मजकूर दि. ३१ मे १९९२ पर्यंत पाठवावा.

संपादक
शेतकरी संघटक

## शेतकरी संघटक : वर्गणी नोंदणीसंबंधी निवेदन

जानेवारी ९२ मध्ये झालेल्या जिल्हा बैठका व जिल्हा प्रदर्शनांच्या काळात शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी शेतकरी संघटकचे वर्गणीदार ठिकठिकाणी नोंदविले आहेत असे या कार्यालयाकडे येणाऱ्या पत्रांवरून दिसते. अशी पत्रे मुख्यतः अमरावती, अकोला, बुलढाणा व परभणी जिल्ह्यांतून येत आहेत. तरी ज्या कार्यकर्त्यांनी वर्गणीदारांची नोंदणी केली आहे त्यांनी वर्गणीदारांची यादी व वर्गणीची रक्कम तातडीने या कार्यालयाकडे पाठवावी.

या काळात नोंदविलेल्या वर्गणीदारांची यादी ज्यांनी याआधी पाठविली आहे त्यांनीही त्यासंबंधी तपशीलवार माहिती पत्राने कळवावी ही विनंती.

– संपादक

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – चाकण प्रिंटिंग प्रेस, चाकण**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
फोन : द्वारा ५०६८२

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**११८७/६६ शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.**